# Success Story

चित्रकलेचे स्वरूप एखाद्या विशाल समुद्रापेक्षा व्यापक व खोल असते. त्यामध्ये कला, ज्ञान, कल्पकता, निसर्ग, कारुण्य, इतिहासाचे वर्णन, छायाचित्रासारखीच दिसणारी.... परंतु हातानी काढलेली हुबेहूब चित्रे पाहिली की मनाला ती स्पर्श करतात व भावना विश्वात घेऊन जातात. शाळेत मुख्य अभ्यासाशिवाय अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी चित्रकला, हस्तकला व खेळ याकडे पाहिले जाते. नुकतेच ''लिओनार्डो दा बिंसी''यांचे ''जीजस क्रिस्ट'' व पावले पिकासो यांचे चित्र अब्जो रुपयाला न्यूयॉर्कला लिलावात विकली गेली. भारतात चित्रकलेचा छंद म्हणूनच पाहण्याचा दृष्टिकोन आजतागायत राहिलेला आहे. त्याचे रुपांतर व्यवसाय, उद्योगात होऊ शकते यांचा विचारच कधी मनाला पटत नाही. शंभर अग्रलेखांची ताकद एका व्यंग चित्रात असते. हे आपण आर. के. लक्ष्मण व बाळासाहेब ठाकरे यांच्या ''व्यंग चित्र'' कलेतून पाहिलेच आहे.

आज Success Story मध्ये आपण भेटणार आहोत. चित्रकलेच्या माध्यमातून स्वत:ची आगळीवेगळी ओळख निर्माण करणारे एक समर्थ चित्रकार, शाईचे रंगांनी खेळणारे, सफेद रंगाचा प्रत्येक चित्रात वापर करणारे म्हणजेच ''श्री. अरुण दाभोलकर'', १४ विद्यांचा व ६४ कलेचा अधिपती असलेल्या ''गणपती''ची सहस्त्र रूपे भाविकांच्या घराघरातून दर्शन घडविणारे व स्वत:ची ओळखच ''गणपती वाला दाभोलकर'' म्हणून ज्यांनी करून घेतली ते कुडाळदेशकर ज्ञातीचे भूषण व विविध अलंकारांनी रंगातून व्यक्त झालेले रत्न म्हणजेच श्री. अरुण दाभोलकर, आज आम्ही भाग्यशाली आहोत. त्यांनी त्यांची Success Story ची गुपिते व दृढनिश्चय स्वत:च्याच शब्दातून मांडला आहे... तो खास आपल्यासाठी!

''गणपती वाला दाभोलकरांवर'' पु.ल. देशपांडे, बाळासाहेब ठाकरे, एस. एम. जोशी, ना.ग. गोरे, बाबासाहेब पुरंदरे अशा अनेक मात्तबर मान्यवरांनी भरभरून प्रेम व कौतुक केले. त्यांच्या अनेक प्रदर्शनांचे उद्घाटन केले. आज त्यांनी जगाचा प्रवास केला, चित्रकलेच्या माध्यमातून एक मोठा व्यवसाय निर्माण केला व प्रस्तापित केला, चित्रकलेच्या विश्वात स्वत:ची एक आगळीवेगळी प्रतिमा व ओळख निर्माण केली. ते चित्रकार अरुण दाभोलकर आपल्या गौड ब्राह्मण ज्ञातीला भूषणास्पद आहेत.

त्यांच्याच कार्याचा आदर्श पुढे ठेवून आज कलेच्या विश्वात ज्यांना करियर करायचे आहे त्या सर्व तरुणांसाठी ही Success Story नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

**– मनीष गुरुदास दाभोलकर**

मी 'गणपतीवाला दाभोलकर

श्री. अरुण गणेश प्रभूदाभोलकर- मु. पो. दाभोली, ता. वेंगुर्ला.

जन्म १९५४ चा प्राथमिक शिक्षण दाभोलीत झाले. अभ्यासात सर्वसाधारण अक्षर छान. चित्रकलेची विलक्षण आवड आणि आकर्षण.

सातवीपर्यंत चित्रकला विषय नव्हताच. त्याबद्दल उसुक्ता होती.

हायस्कूलमध्ये इंटरमिडिएट ड्रॉईंग ग्रेड परिक्षा सी श्रेणीत पास झालो. १९६९ मध्ये मॅट्रीक पास झालो. 'समाजशास्त्र' विषयात एस्.एस्.सी. बोर्डात महाराष्ट्रातून प्रथम आलो. शालेय जीवनात स्पर्धा, अभ्यास, बक्षिसे, कौतूक, जिद्द आणि आदर्श संस्कार या सगळ्यापासून मी फार दूर होतो. चित्रकलेच्या कौशल्याचा पत्ता नव्हता.

'आप्पी दाभोलकर' माझे वडील, प्राथमिक शिक्षक होते. संगीताचे उपासक होते. संगीत विशारद होते. नाट्यप्रेमी होते. वृत्तीने कलंदर नोकरीत लक्ष नव्हते. खुप पैसे मिळवावेतं, कुटुंबासाठी आर्थिक बाजू भक्कम करावी, नाव कमवावे यासाठी प्रचंड मेहनत घेणारे. पण त्यांच्या प्रत्येक प्रयत्नात सततचे अपयश. पत्ता लागू न देता, एके दिवशी सुमारे बारा वर्षांसाठी आप्पा आपल्या कुटुंबापासून परागंदा झाले. आई आणि आम्ही सहा भावंडे निराधार होतो. हालाखीच्या परिस्थितीला तोंड देताना दमछाक झाली. वडीलमुलगा म्हणून मॅट्रीक होताच मी कुटुंबप्रमुख



झालो. आई आणि मी प्रचंड मेहनतकरू लागलो. मॅट्रीक होताच गावातल्या रेशन दुकानावर नोकरीस लागलो. पैशांची नितांत गरज असलेला मी, पुढे काय करायचे अशा विचारात पडलो.

कोणतीच क्षमता, पात्रता, कौशल्य नसतानाही योग्य त्या संधीची वाट पाहू लागलो. विचारांती चित्रकला शिक्षक व्हायच स्वप्न पाहू लागलो. केवळ चित्रांची आवड या छोट्या भांडवलावर भविष्यासाठी स्वप्नांचे इमले बांधायला लागलो.

मुंबईला गेलो. जे. जे. स्कूलच्या प्रवेश परिक्षेत नापास झालो. प्रयत्नाच्या पहिल्याच पावलावर निराश झालो. मालवणला गेलो. दोन वर्षाचा शिक्षकाचा कोर्स केला. ए. टी.डी. ला महाराष्ट्रातून पहिला आलो. या यशाने माझ्यात प्रचंड उर्जा निर्माण झाली. कलाजगतात मुसंडी मारायला हवी असं ठरवलं पुन्हा मुंबई गाठली. प्रगतीचा महामार्ग मुंबईवरून जातो हे माहीत होतं. खुप पैसे कमवायचे होते. प्रतिकुलतेकडून अनुकूलतेकडे सरकायचे होते. भावंडाणा मोठ करायच होते. पराभूत वडिलाना शोधून काढायच होत. समाजाला माझ्या कुटुंबाची दखल घ्यायला लावायची होती. मी माझ्याच अपेक्षांच प्रचंड ओझ घेऊन मुंबईला निघालो. १९७३ला मुक्कामाची जागा माहित नसताना अपरिचीत मुंबईला पोहोचलो.

मुंबईत पोहोचताच काही दिवसात ति. आप्पाना शोधून काढलं. त्यांच्या प्रथम भेटीत त्याने मला ओळखलच नाही. झब्बा घातलेला, छान दाढी राखणारा, कलावंताच्या पोशाखातील समोरचा युवक, आपला विद्यार्थी असणार अश्या विचारात असताना मी माझी 'अरुण म्हणून ओळख दिली. आप्पानी मिठी मारली. आम्ही दोघेही खुप रडलो. आणि ति. आप्पा दाभोलीला घरी निघाले. ति. आप्पांच्या अनुपस्थितीच एक दशक संपल होत. नविन दशकाची सुरूवात झाली होती.

मुंबईत अंधेरीतील परांजपे विद्यालयात चित्रकला शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. चित्रकलेच्या पदवी शिक्षणासाठी रहेजा स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल झालो. सकाळी शाळेत कलाअध्यापन आणि दूपारी कॉलेजमध्ये कलाअध्ययन. मंतरलेले ते दिवस आजही आठवतात. १९७८ मध्ये जी.डी.आर्ट (कमर्शिअल) पदवी परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम श्रेणीत सर्वप्रथम आलो. दूसऱ्याच वर्षी १९७९ मध्ये 'आर्ट मास्टर' परीक्षेत महाराष्ट्रातून सर्वप्रथम आलो. खूप मोठ्या यशाचा भागिदार झालो. नविनच कांही करण्याच्या प्रयत्नांत, दिवाळीत हजारोंच्या संखेने ग्रिटिंग कार्डस् तयार करू लागलो. मास्तरच्या पगारापेक्षा खुप पैसे मिळतात हे लक्षात आलं. शाळेतले विद्यार्थी, पालक, त्यांचे मित्र ग्रिटिंग विकत घेऊ लागले. रंगीत शाईचे माझे प्रयोग, लोकांकडून पैसे घेऊन विकू लागलो. कौतुक, प्रसिद्धी मिळू लागली. 'ग्रिटींगवाले दाभोलकर म्हणून महाराष्ट्राने डोक्यावर घेतल. त्या यशाच्या धुंदीत शिक्षकांची नोकरी सोडली. नविन आणि नविन संधीना सामोरा गेलो. कलारसिकांच्या मनात आपलं स्वतंत्र स्थान असायलाच हवं असा हट्ट धरला आणि जीवनांत चांगल्या अर्थाने एक अपघात घडला.

वॉटर प्रुफ इंक आणि चकचकीत पेपर यांच्या झटापटीत गणेशचित्राची निर्मीती झाली. एका महिन्यात धुंद अवस्थेत शंभर गणपती तयार झाले.

'गणराज रंगी नाचतो' या माझ्या गणपती प्रदर्शनाच्या आणि झटपट चित्रप्रात्यक्षिकांच्या प्रभावी सादरीकरणाने मी महाराष्ट्रातील रसिकांचा कौतुकाचा विषय झालो. माझ्या अगदी पहिल्याच पुण्यातील बालगंधर्वमधील प्रदर्शनाचे आयोजक होते 'पु.ल. देशपांडे, श्री. ना. ग. गोरे (भारताचे इंग्लंडमधील माजी राजदूत) उद्घाटक होते. श्री. बाबासाहेब पुरंदरे, एस्.एम्. जोशी, किरण ठाकूर,

भैय्यासाहेब ओंकार, एस्.एम्. पंडीत, रविंद्र मेस्त्री, त्यावेळच महाराष्ट्राच सर्व मॅत्रिमंडळ माझ हे प्रदर्शन पहायला, प्रात्यक्षिके पहाय्यला आवर्जून आले. सर्व वर्तमानपत्रानी आणि दिल्ली दूरदर्शनने हे प्रदर्शन अख्या भारताला दाखवल. गणपतीवाल्या दाभोलकरला लोकांनी आपल्या मनांत जागा करून दिली. आर्थिक स्थैर्य दिलं.



माझ्या प्रदर्शनाने आणि प्रात्यक्षिकांनी मी संपूर्ण महाराष्ट्र भटकलो. मला मार्गदर्शन आणि मदत करायला माझे वडिल सोबत होते. जादूई कुंचल्याने चित्रे कशी बनतात हे पहायला आणि लोकांच्या रसिकतेची, रसग्रहणाची पावती घ्यायला, एका बेभान अवस्थेत महाराष्ट्र सोडून भारतातील प्रमुख शहरी फिरायला लागलो. गोव्याच्या प्रदर्शनात एक सुंदर गोमंतक युवती संपर्कात आली. पी. टी. आय. अधिकाऱ्याच्या या मुलीबरोबर लग्न झालं. सुगंधा सरदेसाई सौ. सुगंधा अरुण दाभोलकर झाली. चि. अमेय आणि चि. सर्वेश हे दोन मुलगे. सायन्स पदवीधर माझ्या मुलांचा कुडाळच्या एम्.आय्.डी.सीत 'अमेय हॅन्डीक्राफ्ट इंडस्ट्रिज' नांवाने उद्योग आहे. भारतभर माझी चित्रे वितरीत होतात. आज मी दाभोली या छोट्याशा गांवात रहातो. या घरकुलात चित्रांच्या निर्मितीत गुंतलेला असतो. माझ्या बेजबाबदार, बेशिस्त नवनिर्मितीची जोड देऊन रसिकांना काही चांगल देवू शकतो का? याचा विचार चालू असतो.

आज संगणकाचा जमाना आहे. कॉम्प्युटर, वेबसाईट, इंटरनेट, सोशलमिडीया, मोबाईल, डिजिटल जग भरून राहीलय. पण ही सगळी डिजिटल टेक्नॉलॉजी आहे. कॉम्प्युटरमध्ये सृजनशक्ती नाही. भावदर्शन नाही. नवनिर्मिती नाही. तो आपला मदतनीस आहे. चैतन्य आणि संवेदना जिवंत माणसाकडेच असतात. टेक्नॉलॉजीमध्ये त्या नसतात. आज जगाला कलावंत आणि कारागिरांची नितांत गरज आहे. कलावंतच कॉम्प्युटरकडे अगदी अचुकपणे काय मागायचे ते ठरवू शकतो. मोबाईल मेसेज करून आपल्या शुभेच्छा पाठवणं हा नुसताच सोपस्कार असतो. मेल पाठवून तत्परतेने व्यवहार पूर्ण करतो. पण त्या पलीकडे हाताने चित्र तयार करून त्यावर सुंदर शब्दरुपी संवेदना पाठविल्यास पहाणाऱ्याला आणि वाचणाऱ्याला प्रेमपूर्ण आनंद मिळतो. शुभप्रसंगी भेटवस्तू देण्याने, प्रेम आणि जिव्हाळा वृद्धिंगत होतो. आज आमच्या कारखान्यात ग्रिटिंग तयार होत नाहीत तर माझ्या चित्रांच्या सुंदर फ्रेम्स् आणि भेटवस्तू तयार होतात. कोकणातील कारागिरांना रोजगार मिळतो. काही कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. चित्रकला उद्योगातून खूप पैसा मिळतो. भारतीय माणसाच्या अगदी सामान्यांच्या घरांतील एक भिंत माझ्या चित्रांसाठी राखून ठेवावी असे भव्य स्वप्न पहात पहात दिवसा मागून दिवस संपताहेत. माझी भारतीय संस्कृती चित्ररूपाने घराघरांत पोहोचावी हा ध्यास आहे. दाभोलकर हे नाव न वाचताच समोरचे चित्र हे दाभोलकरांचेच आहे अशी ओळख सामान्य रसिकांपर्यंत अधोरेखीत व्हावी असा अट्टाहास आहे. सतत वाचत राहिलो तर त्यातील साहित्यमूल्या समजायला लागतात. सतत संगीताच्या सहवासात राहिलो तर कान तयार होतात. त्यातील सौंदर्याच्या जागा समजतात. सतत चित्र पहात राहिलो, प्रदर्शन पाहिली तर डोळे तयार होतात. चित्राचा आस्वाद कसा घ्यावा हे मनाला आणि डोळ्याना समजते. त्यासाठी प्रत्येकाने चित्रकार होण्याची गरज नसते. आपण ज्या क्षेत्रात काम करतो. उद्योग व्यवसाय करतो. त्यात स्वत:ला रमण्यासाठी, फुलण्यासाठी, जिथे-जिथे सौंदर्य आहे त्याचा आस्वाद घेण्याची किमान पात्रता प्रत्येकाकडे असायला पाहिजे. धकाधकीच्या या जिवनात दोन मिनिटांसाठी स्वत:ला विसरण्याची ताकद कलेच्या आस्वादात आहे. प्रत्येकाला आपलं स्वत:चं जिवन संगीत तयार करायला आपले मन, डोळे, कान, ज्ञानेंद्रिये यांची जाणीव पूर्वक मशागत करायलाच हवी.

आज संगणक चालवणारा, वापरणारा प्रत्येकजण, कमर्शियल आर्टिस्ट झालाय. व्यापारी कलेचं स्थान खुप आहे. पण फाईन आर्ट म्हणजेच अभिजात कलेचस्थान त्याहीपेक्षा अधिक आहे. अभिजात कलावंत आपल्या चित्रात स्वत:ची अभिव्यती व्यक्त करतो. त्याच्या



पेंटिंगमध्ये त्याचं व्यक्तीमत्व शैली त्याचे रंग, विषय अंतर्भूत असतात. तो स्वत: करीता चित्र काढतो. मला मात्र असे वाटते- की माझ्यासाठी चित्र काढता काढता, दुसऱ्यांसाठी सुद्धा ती काढावीत. खास करून सामान्यासाठी काढावीत. धनिकांसाठी चित्र काढण्यापेक्षा आणि त्याना विकण्यापेक्षा, सामान्यांच्या सौंदर्यदृष्टीला आनंद देणारी कमी किंमतीतील चित्रे काढावीत. सामान्यांच्या खिशाला परवडणारी निर्मिती आपण करावी. कलेसाठी कला आणि जिवनासाठी कला यांचा समन्वय साधून चित्रे काढावीत. कमर्शियल आर्ट आणि फाईन आर्ट यांचा सुरेख मेळ साधावा. कलावंतामधील प्रतिभावंताला, कारागिराला, कलाकारीला, विचारवंताला, संकलकाला, आव्हान देणारी स्वातंत्र देणारी चित्रे काढावीत. वास्तवशैलीकडून टप्याटप्प्याने अमूर्ताकडे जाणारी, समजणारी आणि काहीच न समजताही अंतर्मुख करणारी चित्रे काढवीत. चित्रकलेच्या क्षेत्राला समर्पित स्थितीकडे जाणारी, गुणवत्तेचे नवीनच पदर दर्शविणारी, आधुनिक कलाजगताला 'व्वा ऽऽऽ असं म्हणायला लावणारी चित्रे हवीत.

चित्रनिर्मितीसाठी राजा रवी वर्माला मी गुरु मानतो. रवी वर्माने देवी आणि देव संस्कृती सुबकपणे चित्रांतून साकारली. लोक लक्ष्मी, सरस्वती मनात साठवून ठेवू लागले. राजा रवी वर्माने स्वत:च्या छापखान्यात आपली चित्रे छापली आणि भारतात, अगदी घराघरात ती वितरीत केली. त्यांचा वारसा चालविण्याची क्षमता माझ्यात नाही. तरीही तसा प्रयत्न करायला काय हरकत आहे.

नुकतेच ''लिओनार्डो दा व्हिन्सी' या चित्रकाराचे चित्र प्रचंड किंमतीत विकले गेले. पावलो विकासो, व्हॅनगॉग या पाश्चिमात्य चित्रकारांची पेंटिंग आज कित्येक मिलियन डॉलर मध्ये विकली जातात. आपल्या भारतातील हूसेन गायातोंडे या प्रख्यात चित्रकारांची पेंटिंग काही कोटी रुपयांत विकत घेतली जातात. माझ्या सारख्या सामान्य चित्रकारांना, कलारसिकांना असा प्रश्न पडतो की हे सगळे प्रत्यक्षात घडते कसे? चित्रकारांनी चित्रे कोणत्या कालखंडात काढली, चित्रकार आणि चित्र या मागचा इतिहास, जागतिक कलाक्षेत्रात गुणवत्तेचा, प्रकटीकरणाचा, माध्यमांचा तत्कालीन समाजजिवनाचा अर्थकरणाचा, रसग्रहणाचा एक प्रचंड मोठा टप्पा दर्शविणारी पेंटीग आपली किंमत वाढवतात. या व्यवसायात अलीकडे कोटीच्या कोटी उड्डाणे घेण्याची ताकद असते. मानवी विकासाच्या, गुणवत्तेचा एक मोठा युगाला ही पेंटींग गवसणी घालतात, नवा इतिहास घडवतात. ललीत कलेच्या सर्वच क्षेत्रात हे घडत रहाणार. व्हिन्सी, पिकासो, व्हॅनगॉग, गायतोंडे या चित्रकारांनी ते जिवंत असताना कलेतून पैसे मिळविले नाहीत, पैशांसाठी त्यानी पेंटिंग तयार केली नाहीत हे आजच्या काळातील चित्रकारानी लक्षात ठेवायला हवे.

तरुण पिढीला मी एवढच सांगेन चित्र आणि त्याचा व्यवहार याकडे जरूर लक्ष हव- मात्र या क्षेत्रासाठी अपारकष्ट करावेच लागतील. निर्मितीच्या विचारात, चिंतनात आणि प्रत्यक्ष कामात झोकून दिल्याशिवाय आणि स्वत:चे अस्तित्व विसरल्याशिवाय हे शक्य नाही. कलाक्षेत्र हे आजच्या युगात उद्योगक्षेत्र आहे आणि ज्ञानाचा उपयोग संपत्ती, रोजगार, व्यापार या साठीही व्हायला हवा.

कोणाही व्यक्तिची कलाकाराची, Success Story ही पहाणाऱ्यांच्या, रसिकांच्या मनांत, डोक्यात असते. ती कलाकाराच्या मनांत नसतेच नसते. कलाकाराच्या प्रत्येक धडपडीतील पराभवाची, अपयशाची ती गाथा असते. अगदी सर्वानांच उत्साहीत करणारी-प्रेरणा देणारी.

**अरुण दाभोलकर**

फोन : ०२३६६-२६२६१६

मो. : ९४२३४०५८५३